महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. जेएलएम-०२२५/प्र.क्र.२७/तुरुंग-२, दि. ०३/०७/२०२५.

**विषय :-** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ३०२ च्या अंमलबजावणीतून काही व्यक्तींना वगळण्याकरिता, कलम ३०३(१) च्या अनुषंगाने राज्य सरकार किंवा केंद्र सरकार यांचेकडून आदेश/ विशेष आदेश प्राप्त करणेकरीता अवलंबावयाची प्रक्रिया.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. जेएलएम-०२२५/प्र.क्र.२७/तुरुंग-२, दि. ०३/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७०३११५००५०७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 05-07-2025 15:16:20

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / नियोजन व समन्वय / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).

अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ३०२ च्या अंमलबजावणीतून काही व्यक्तींना वगळण्याकरीता, कलम ३०३(१) च्या अनुषंगाने राज्य सरकार किंवा केंद्र सरकार यांचेकडून आदेश/विशेष आदेश प्राप्त करणेकरीता अवलंबावयाची प्रक्रिया.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - जेएलएम-०२२५/प्र.क्र. २७/तुरुंग-२,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः ०३/०७/२०२५.

**प्रस्तावना:**

१. केंद्र शासनाने नव्याने तयार केलेल्या तीन नविन फौजदारी कायद्यांची दिनांक ०१.०७.२०२४ पासून देशात अंमलबजावणी करण्यात आली आहे. सदर कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने केंद्रीय गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून वेळोवेळी आढावा घेऊन उपाययोजना करण्यात येत आहे.

२. सदर संहितेच्या कलम ३०२ नुसार, फौजदारी न्यायालयास, एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला न्यायालयात दोषारोपास उत्तर देण्यासाठी, चौकशी किंवा साक्ष देण्यासाठी तुरुंगातून न्यायालयात हजर करण्याचे आदेश संबंधीत तुरुंग अधिकाऱ्यास देण्याचा अधिकार आहे.

३. सदर संहितेच्या कलम ३०३(१) अन्वये ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला कारागृहाबाहेर काढणे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून धोक्याचे आहे, अशा व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला कारागृहाबाहेर न आणता, व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे मा.न्यायालयासमोर उपस्थित करण्याबाबत आदेश / अधिसूचना / शासन निर्णय निर्गमित करण्याचा अधिकार शासनास दिला आहे.

४. कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला ज्या तुरुंगात बंदिस्त किंवा ताब्यात ठेवले आहे, त्या तुरुंगातून बाहेर काढले जाऊ नये, तसेच कलम ३०३ च्या उपकलम (१) अंतर्गत आदेश/विशेष आदेश देण्यापूर्वी, राज्य सरकार किंवा केंद्र सरकार ,कलम ३०३ च्या उपकलम (२) नुसार खालील बाबीचा विचार करेल: -

(अ) ज्या गुन्ह्यासाठी किंवा ज्या कारणास्तव, व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला, तुरुंगात बंदिस्त किंवा ताब्यात ठेवण्यात आला त्या गुन्ह्याचे स्वरूप,

(ब) अशा व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला तुरुंगातून बाहेर काढण्याची परवानगी दिली गेली तर सार्वजनिक सुव्यवस्थेचा भंग होण्याची शक्यता,

(क) सार्वजनिक हित.

## शासन निर्णय :-

१. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ३०३(१) अन्वये, कलम ३०२ च्या अंमलबजावणीतून काही व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला वगळण्याकरीता, कलम ३०३(१) च्या तरतूदीनुसार, राज्य सरकार किंवा केंद्र सरकार यांचेकडून आदेश / विशेष आदेश प्राप्त करण्याकरीता, कारागृहनिहाय स्थानिक पातळीवरील वरीष्ठ अधिकारी यांची समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

- संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/ पोलीस आयुक्त - अध्यक्ष
- संबंधित जिल्हयाचे मा. मुख्य न्यायदंडाधिकारी - उपाध्यक्ष
- संबंधित कारागृह अधिक्षक - सदस्य सचिव

२. उपरोक्त समितीची आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक /पोलीस आयुक्त यांनी बैठक आयोजीत करावी. सदर बैठकीत ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला कारागृहाच्या बाहेर काढणे धोकादायक आहे, अशा व्यक्तीची किंवा व्यक्तीच्या समुहाची सर्व प्रकरणांची यादी समितीच्या विचारार्थ ठेवून, त्यावर समितीने प्रकरणपरत्वे, कारणासहीत निर्णय घेण्यात यावा.

३. सदर समितीने प्रकरणपरत्वे कलम ३०३ (१) च्या अनुषंगाने निर्णय घेतांना, कलम ३०२ व कलम ३०३(२) मधील कायदेशीर तरतुदी लक्षात घेऊन, कलम ३०२ च्या अंमलबजावणीतून काही व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या समुहाला वगळण्याकरीता, शासनास आदेश / विशेष आदेश काढण्याची शिफारस कारणांसह करावी. समितीची शिफारस, अपर पोलीस महासंचालक, कारागृहे व सुधारसेवा यांच्या कार्यालयामार्फत त्यांच्या योग्य त्या शिफारशीसह पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करण्यात यावी. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी ती तपासून, संबंधित व्यक्ती किंवा व्यक्तीच्या समुहाने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप, सदर व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या समुहाला तुरुंगाच्या बाहेर आणल्यास सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊन, त्यावर त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास तात्काळ सादर करावी. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या शिफारशींवर शासन अंतिम निर्णय घेईल व शासनाच्या अंतिम निर्णयाच्या अनुषंगाने पुढील योग्य ते आदेश / विशेष आदेश शासन स्तरावरून निर्गमित केले जातील.

४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७०३११५००५०७२९ असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या नावाने आणि आदेशानुसार.

NARAYAN BIRA MANE

Digitally signed by NARAYAN BIRA MANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=1dfb457576797050f19aafaa495673fc843c789942459cd39fc5561071b4a70c, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=79C09BA352C5B3E65B259113F1CDCFAB29FB961D4EA9A24411D7F622D2ED20BF, cn=NARAYAN BIRA MANE
Date: 2025.07.03 11:51:06 +05'30'

**(नारायण बि. माने)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रती,**

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामिण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. प्रबंधक (Judicial-II), अपिलेट साईड, मा. उच्च न्यायालय, मुंबई
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व जिल्हयांचे मा. जिल्हा मुख्य न्यायदंडाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१०. सर्व पोलीस आयुक्त / सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य,
११. सर्व कारागृह उपमहानिरीक्षक / कारागृह अधिक्षक, महाराष्ट्र राज्य,
१२. उप सचिव (विधी/विशा-९) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. सह सचिव, केंद्रीय गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली,
१५. कक्ष अधिकारी (विशा-९), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवडनस्ती, तुरुंग-२.